# स्त्रीयांच्या आत्मचरित्रावरील स्त्रीवादाचा प्रभाव

प्रा.डॉ.बापू जी घोलप
मु.पो. लिंबागणेश ता. जि. बीड ४३११२६
मो. ७५८८०५७६९५

स्त्रीयांना चुल आणि मुल या व्यतिरीक्त तिच्या अस्तित्वाची ओळख देण्यासाठी प्रयत्न केले जाऊ लागले यात ब्रिटीशांच्या सुधारणावादी विचारांचा खूप फायदा झालेला आहे. सतीच्या चाली विरुध्द ब्रिटीशांनी कायदा केला. स्त्रीला लहान मोठया नौकरीच्या संधी देवून तिला स्वावलंबी स्वातंत्र्याचा अनुभव मिळू लागला. सर्वच क्षेत्रात नविन विचारांचे वारे वाहू लागले. क्रांतिकारक विचारांची एक चळवळ आकाराला येवू लागली. सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात सुधारणावादी विचार अमलात आणण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले. राजकीय क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात स्त्रियांच्या सहभागाला सुरुवात झाली. एकविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्री मुक्तीची चळवळ पुढे आली. आज ती एकविसाव्या शतकातील स्त्रीचा मुख्य आधार ठरत आहे. हया स्त्रीवादी विचारांचा प्रभाव स्त्रीयांच्या लेखानावर झालेला आहे.

स्त्रियांच्या मनोवृत्तीत एकविसाव्या शतकाच्या उंबरठयावर बराच बदल झालेला दिसून येतो. स्त्रीवादी चळवळीला १९७५ नंतर गती आलेली दिसून येते. त्यामुळे या चळवळीत प्रत्यक्ष भाग घेतलेल्या स्त्रीयांची आत्मचरित्रे १९९०-९५ नंतरच्या कालखंडात आलेली आहेत. उदा. ऊर्मिला पवारांचे आयदान त्यादृष्टीने अत्यंत मोलाचे आहे. कमल पाध्ये यांचे बंध-अनुबंध, मंगला भागवत यांचे कुण्या एकीचे अंतरंग या सारख्या बऱ्याच आत्मचरित्राचा स्त्रीवादाच्या दृष्टीने विचार होणे महत्त्वाचे आहे.

मराठीतील स्त्रीयांच्या आत्मचरित्राचा विचार करताना लक्षात येते कि या काळात स्त्री जीवनात खूप परिवर्तन झालेले आहे. शैक्षणिक क्रांती, पाश्चात्य विचारांचा ओघ, संशोधन, विज्ञानवाद यांचा फार मोठा प्रभाव या काळातील स्त्री जीवनावर पडलेला आहे. आज स्त्री ही बुध्दी किंवा पात्रता यात पुरुषांच्या बरोबरीने वागताना दिसते आहे. एकंदरीत आत्मचरित्रावरील स्त्रीवादाचा प्रभाव खालील ठळक मुद्यांच्या अनुषंगाने करता येईल.

स्त्रीयांच्या आत्मचरित्राचा अभ्यास करताना आत्मचरिकार लेखिकांनी प्रस्थापीत अर्थाने काही स्त्रीवादी विचार मांडलेले दिसून येतात. अनेक जाणत्या लेखिका अशा आहेत की त्यांना स्त्रीवादी विचारांची जाणीव आहे, ओळख आहे. स्त्रीवादाच्या प्रभावातून त्यांनी काही विचार प्रगट केलेले दिसून येतात. लेखिकांच्या आत्मचरित्रांवरील स्त्रीवादी विचारांचा प्रभाव तपासताना प्रत्यक्ष ह्या लेखिकांनी वेगवेगळया घटना प्रसंगाच्या अनुषंगाने स्त्री -वादावर प्रकाश पाडू शकणारे काही निवेदन केलेले आहे. स्त्रीयांनी तत्कालीन समाज संस्कृतीच्या प्रवाहापेक्षा वेगळा विचार मांडला आहे. ह्या बंडखोरीच्या वेगळया पायवाटेवर चालताना त्यांना काहीसा त्रास सोसावा लागला. प्रस्थापितांना (पुरुषांना) न रुचणारे विचार त्यांनी लिहीले आहेत. हे करीत असताना काही जणींना शिक्षण हीच मुख्य प्रेरणा कारणीभूत झाली तर कुणी पतीचे संस्कार सहवास यातून घडल्या आहेत.

स्त्री ही कुटूंबातील एक घटक आहे. तिला सन्मान मिळावा. अन्यायकारक रुढी तिच्यावर लादू नयेत यासाठी तळमळून स्वानुभवातून या लेखिकांनी लिहीले आहे. आजची स्त्री सक्षम आहे तरीही तिच्या रंगाला, रुपाला म्हणजे शरीरालाच का महत्त्व दिले जाते म्हणून ती तडफडते. तिचे आत्मभान जागृत झाले आहे. प्रत्येक गोष्ट ती परंपरा म्हणून स्विकारीत नाही. त्यामागचे कारण जाणून घेण्याचा ती प्रयत्न करते. कमल पाध्ये यांनी त्यादृष्टीने अत्यंत सडेतोड चिंतन केलेले आहे.

कुण्या एकीचे अंतरंग ह्या आत्मकथेची सुरुवात कोणत्याही मुलीच्या जन्माभोवती स्पष्ट -अस्पष्टपणे वावरणारी, जी नकोसेपणाची अवहेलनेची लोकभावना आहे तिथपासून होते. स्त्रीत्वावर पडणारी अनेक बंधने सर्मथपणे बाजूला सारुन एक मोठे कार्य उभे करणाऱ्या कार्यकर्त्या स्त्रीचे व्यक्तिमत्व आपल्या पुढे उभे राहत. स्त्रीशक्तीचा, त्यांच्या समूहाचा

विधायक कार्यशक्तीचा वेगळा प्रत्यय वाचक घेत जातो. आत्मचरित्राच्या अखेरच्या प्रकरणात सामाजिक आणि कौटूंबिक यशापयश एकमेकांमध्ये मिसळून जाते आणि हेही लक्षात येते की, नव्या स्त्रीयांची सुख-दु:खे आपण नेहमी म्हणतो त्यापेक्षा पुष्कळच वेगळी झाली आहेत. अनुभव माणसाला घडवितो असे जे आपण म्हणतो ते स्त्रीच्या बाबतीतही होताना दिसते. ज्या दु:खामुळे जिव्हारी घाव बसून आयुष्य विफल झाले असे एखाद्या जुन्या स्त्रीला वाटायला लागले असते ती गोष्ट आता नव्या स्त्रीला काहीशा अलिप्ततेनेही पहाता येते आहे. मंगला भागवत यांनी खास स्त्रीवादी विचारसरणीचे चिंतन आपल्या प्रत्यक्ष कृतीतून अभिव्यक्त केले आहे. त्यामुळे ती स्त्री प्रश्नांची वैचारिक चर्चा करणारी पोपटपंची नसून प्रत्यक्ष कार्यकर्तीची गाथा या अर्थाने श्रेष्ठ आहे. आपलाच संसार, व्यक्तीगत आयुष्यापलीकडच्या दुसऱ्यांच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी त्यांनी घेतलेली भूमिका सशक्त स्त्रीचीच आहे. त्या स्त्रीमुक्ती चळवळीत सक्रीय होत्या. विलेपार्ले संघाच्या त्या नेत्या राहिलेल्या आहेत. कुपोषित बालकांचे प्रश्न, कामगार स्त्रीयांचे प्रश्न, कौटूंबिक स्त्रीयांचे दैनंदिन प्रश्न यासाठी त्यांनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरुन संघर्ष केलेला आहे. साध्या महिलांच्या कार्यक्रमाच्या उद्‌घाटनाला थोर पुरुष बोलावण्यालाही त्यांचा विरोध असायचा. या आत्मचरित्रात लेखिका केवळ आपला स्वत:चा उदो उदो करीत नसून महिला संघाने मिळून जे कार्य केले त्या संघाच्या चाटचालीचा त्यातील सहभागी स्त्रीच्या नावासह उल्लेख त्यांनी केलेला आहे.

कमल पाध्ये यांचे बंध-अनुबंध अभ्यासताना असे लक्षात येते की, त्यांची स्वत:ची स्त्रीविषयक स्वतंत्र भूमिका आहे. अनेक ठिकाणी त्यांनी केवळ स्त्रीकेंद्रीत चिंतनाला वाव दिलेला आहे. स्त्री प्रश्नांची चर्चा त्यांनी समग्रतेच्या परिप्रेक्षात केलेली दिसते. त्या दादा धर्माधिकारी यांच्या विचारशैलीच्या निमित्ताने सांगतात , ‘‘स्त्रीशक्तीवर आणि स्त्रीक्रांतीवर प्रचंड विश्वास असलेल्या या सर्वोदयी विचारवंताने अनेक क्षेत्र आपल्या विद्वत्तेनं तेजाळली. मातृत्व, सुंदरता हीच स्त्रीची प्रतिष्ठा, त्यावर घातलेलं पत्नीत्वांच भरभक्कम कुंपण त्या चौकटीनं तिच्यावर लादलेली नितीनियमांची अन्याय्य बंधनं, बाईचं बघावं सौंदर्य आणि पुरुषाचा पाहावा पराक्रम यासारख्या उक्तींनी केलेली तिच्या व्यक्तित्वाची अवहेलना, बलतकार करणाऱ्या ऐवजी बलत्कारीत स्त्रीलाच दोषी ठरवून तिची आणि तिच्या मातृत्वाची होणारी विटंबणा, पुरुषप्रधान समाजाच्या या आणि अशा अनेक अन्यायी गोष्टीबद्दल कधी चिडून तर कधी समजून घेण्याच्या दृष्टीन दादांशी मी सतत दिलखुलासपणे बोलत असे. माझ्या अनेक प्रश्नांना त्यांनी दिशा दाखवली. अनेक शंकाची उकल केली.’’

लेखिकेने चर्चेतून कधी, तर अनुभवातून अवलोकनातून कधी आपल्या विचारांची बैठक पक्की केलेली दिसते. त्यांनी स्त्रीत्वाचा अपमान करणाऱ्या प्र. के. अत्रे यांना सर्वात नालायक पुढारी ठरवले आहे. (पृ.२०६) आणि स्त्रीत्वाचा अभिमान व्यक्त केला आहे. पुढे एका ठिकाणी त्या लिहितात की, ‘‘स्त्रीयांची अवहेलना ओळखून त्या विरुध्द स्वत:च उभ राहणं आवश्यक आहे. मेल्याशिवाय स्वर्ग दिसणार नाही आणि आपण मेल्याशिवाय तरुण पिढीही आपल्यासाठी खपणार नाही. या ठाम विचाराचा पगडा मी दिल्लीहून आले तेव्हा माझ्या मनावर होता. आम्ही दिल्लीला गेलो तेव्हा सर्वच नवं आणि नवे अनुभव देणारं होतं. स्त्रीच्या मादी आणि माता या रुपापेक्षा तिच्या स्वंतंत्र व्यक्तित्वांचं दर्शन मला अनुभवायचं होतं, पण तसं ते स्वत:च घडवायला हवं होतं हे मात्र जाणवून गेलं’’

रागीनी पुंडलीक यांनी संपूर्ण ‘‘साथसंगत’’ भर नवऱ्याला घरचाच आहेर अर्पण केला आहे. म्हणजे पुंडलिक यांच्या साहित्यावर साक्षेपी पध्दतशीर अशी समिक्षा केली आहे. हे करता करताच एका ठिकाणी त्यांनी स्त्री मुक्तीसंबंधीघरी घडलेला खुसखुशीत प्रसंग दिला आहे. विद्याधर पुंडलिक स्त्रीमुक्तीवर व्याख्यान द्यायला गेले होते. तिथल्या बायका एक दिवशी चक्क पुंडलीकांच्या घरीच आल्या. त्या बायका म्हणाल्या, ‘‘अहो काल आमचं लोणावळयाला शिबिर झालं ना स्त्री मुक्तीवर , त्यात पुंडलिकांनी सुचवलं की, या बायकांना फक्त वर्षानुवर्ष पोळयांचा त्रास होतो, म्हणून पोळयावर कुणीतरी यंत्र शोधलं पाहिजे किंवा आपण पुरुषांना बाकी नाही तर त्या बाबतीत तरी ह्यांना मदत केली पाहीजे. आज आम्ही पुंडलिकाच्या हातच्या पोळ्या खायला आलो आहेत. का हो रागिणीबाई ह्यांनी केली का कधी तुम्हाला मदत पोळ्या करायला.’’ ह्या प्रसंगातील थट्टा सोडून दिली तरी गप्पा मारणाऱ्या व लेखक म्हणून मिरवणाऱ्याकडून स्त्रीमुक्तीची

कशी टिंगल होत असेल याची कल्पना येते. किंबहूना साधा मध्यमवर्गीय पुरुष स्त्रीवादासंबंधी काय विचार करीत असेल हे कळते.

विद्यादेवी परचुरे यांचा समस्त पुरुषवर्गाने व समाजाने पुरता छळ केला आहे तरी बिचाऱ्या ह्या साध्वी परचुरे बाईनी चुरमुऱ्याचे लाडु खाउन गप्प बसलेल्या आहेत. नवऱ्या विरुध्द वागणे त्यांना पाप वाटते. मग त्याने आपल्या बेडरुममध्ये पक्षकार बाईला रोज आणून बीयर पिली तरी ह्या विद्या-देवी त्यांना चकणा पुरवतात. तेव्हा वाटते कसली ही संस्कृतीच्या जाळ्यात अडकलेली अबला स्त्री..! आपल्या समाजातील कुलवधु  तोंड दाबून बुक्याचा मार खाते.

स्त्रीवादी विचारांमध्ये इंदुमती जोंधळे यांच्या दृष्टीकोनाचा विचार करता तो आणखी भिन्न आहे. त्यांना आयुष्यात ज्या पुरुषांनी मार्गदर्शन केले त्यांचा मनापासून गौरव केला आहे. एकीकडे समाजकल्याण खात्याचे अधिकारी निकम यांच्या विषयीचा विदारक अनूभव तर दुसरीकडे पुज्य असे दादा धर्माधिकारी , आचार्य भागवत, अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे, शामराव पटवर्धन, एसेम जोशी, नाना डेंगळे, गजाननराव गायकवाड यांच्यासारख्या थोरांचा उल्लेख केलेला आहे.

इंदुमतींच्या आयुष्याचे अनुभव दलित स्त्रीच्या उपेक्षित जिण्याशी साधर्म्य दर्शक आहेत. पण जोंधळेंचा प्रवास वेगळ्या अंगाने व्यक्त झालेला आहे. एक अनाथ मुलगी असताना, कुणाची काही बंधने  नसताना हया तरुणीने कुठेही प्रवाह पतित न होता आपले शिल रक्षण करीत आणि कुणावरही दोषारोपण न करता मनाची सात्विकता दाखवली आहे. जाणती कर्ती झाल्यावरही ती स्त्रीत्वाचे भांडवल अगर स्त्रीवादावरील गप्पा मारीत नाही अगर त्या विचारांचा बडेजाव मिरवित नाही हे या आत्मचरित्राचे वैशिष्टय म्हणावे लागेल.

''गुलमोहर'' मध्ये कुंन्दा जगदाळे यांनी प्रामुख्याने आपल्या लैंगिक अनुभवासंदर्भात आणि अगदी खाजगी अनुभवासंदर्भात स्त्रीत्वाचा शोध घेतलेला दिसतो. त्यांना स्वातंत्र्य, मान-सन्मान सगळ्याची गरज आहे पण नेमकी जगदाळे यांची स्त्रीपुरुष भेदनिती शरीरीक अनुभवापासून सुरु होते. जगदाळे यांचा मानसिक, वैचारिक वा सामाजिक मतभेद फार कमी झालेला आसतो. हया अतृप्तीत त्या लिहितात, ''कामापुरती कामिनी नी नंतर मात्र कचऱ्या करिता केरसुणी असंच घरातलं माझं स्थान होतं. कामापुरती जवळ केलेली वेश्या आणि मी यात काय फरक आहे. त्या मोबदल्यात तिला पैसे तरी मिळतात. हा मला काय देतो. कटु शब्द. आमचं पतीपत्नीचं नातं केंव्हाच संपुष्टात आलं आहे. त्यामुळे मला हा व्याभिचार वाटतो. तरीपण तो सदैव माझ्या डोळ्यासमोर असावा असं सारखं वाटत राहतं.'' येथे लेखिकेला आलेले अनुभव अत्यंत दाहक, परिणामकारक आहेत पण अभिव्यक्तित उणेपणा राहीला आहे. त्या अत्यंत टोकाची भाषा वापरताना दिसतात. या आत्मचरित्रात गुलमोहर-२ म्हणून अर्धाभाग पुढे दिला आहे. त्यात नारायण जगदाळे आपले मत सांगतात, तेंव्हा त्यांनी आपल्या नेमक्या स्वभावाची व आवडीची चर्चा केली आहे व जे पत्नीबाबत चुकले ते स्वाभाविक घडले असे म्हटले आहे.

साधना आमटे यांनी आपल्या स्त्रीत्वाची सगळी शक्ती समाजकार्यासाठी खर्च केलेली आहे. १९९० नंतरच्या स्त्रीह आत्मचरित्रापैकी हे अत्यंत वेगळे व उदात्त कार्यास वाहून घेतलेल्या स्त्रीचे आदर्श सहधर्मचरिणीचे व अलौकिक प्रेयसीचे आत्मकथन आहे. या आत्मकथनात बाबा आमटेंच्या कार्याचा, स्वभावाचा यथोचित गौरव आहे. त्याचप्रमाणे अत्यंत सौम्य व प्रेमाच्या शब्दांत त्यांची पुरुषी कृतीही दाखवली आहे. तसेच हेमकलसा, नर्मदा बचाव आंदोलन, आंनदवनात येणाऱ्या थोर पुरुषांच्या भेटीचे व कृतीचेही चित्रण केले आहे. आनंदवनचे उद्घाटन विनोबा भावेंच्या हस्ते झाले. आचार्य भन्साळी, प्रा.जे.स्त्री. कुमारप्पा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, डॉ. पटवर्धन, अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे यांच्या सारख्या थोर पुरुषांचा साधनाताईंनी गौरव केलेला आहे. त्यांना आपल्या कामाचा गर्व, अहंकार कुठेही दिसत नाही.

विदर्भ साहित्य संघाचे चौतिसावे साहित्य संमेलन आनंदवनात झाले होते. त्याच्या स्वागताध्यक्ष साधनाताई होत्या. तेव्हा त्या भाषणात त्यांनी स्त्रीवादाबदद्ल म्हटले आहे की, ''स्त्रीमुक्ती आणि स्त्रीजागर हयाकरीता आजपर्यंत अनेक अधिकारी व्यक्तींनी कार्य केले आहे, करीत आहेत आणि भविष्यातही ते चालणारच आहे. माझ्या मते सेवा करुणा, श्रध्दा, दया , भक्ती, स्फुर्ती, प्रेरणा आणि व्यथा या शब्दांचा वापर पुरुषवर्ग मोठया अभिमानाने करीत असला

तरी हे शब्द स्त्रीलिंगी असल्यामुळे ते स्त्रीच्या प्रकृतीधर्माचे द्योतक आहेत तरी स्त्रीयांनी आपला हा स्वधर्म जोपासला पाहीजे. म्हणजे पुरुषांनी त्या बाबतीत बेफिकीर व्हावे असा त्याचा अर्थ नाही तरी पण स्त्रीयांनी केवळ स्वकुटुंबांच्या कुंपणात सदैव अडकुन न पडता हया सर्वांना बंधमुक्त करुन त्याची चौफेर उधळन समाजाच्या ठिकाणी केली पाहीजे दुख:शी आणि वेदनेशी नाते म्हणजे माणुसकी नाते अशी माझी श्रदधा आहे. हया श्रदधेपोटी त्यांनी जन्मभर कार्य केलेले आहे. स्त्रीप्रश्नांची, स्त्रीवादाची फक्त पोपटपंची करणाऱ्यापेक्षा प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या त्या कार्यकर्त्या होत्या. मोठया मनाच्या भारतीय स्त्रीच्या त्या प्रतिनिधी होत्या. तशाच उपेक्षित स्त्री जीवनाचा आधार होत्या, म्हणून त्या महान ठरतात. त्यांचे कार्य थोर ठरते. सुदैवाने त्यांना बाबांसारखा जोडीदार मिळाला ही दैवी लिलाच म्हटली पाहीजे. खऱ्या अर्थाने समीधा हे स्त्रीच्या कार्यकर्तृत्वाचे शिखर आहे.

**सारांश :-**

अशा प्रकारे स्त्री लेखिकांच्या आत्मचरित्रवरील स्त्रीवादाचा प्रभाव अभ्यासाना असे दिसते की बहुतांश स्त्रीयांनी स्त्रीवादी दृष्टिकोनातून आपल्या जीवन कहाणीकडे पाहीलेलेच नाही तर सरळ साध्या पध्दतीने आपल्या दुख्रा:ची गाथा दिली आहे. ज्या मोजक्या लेखिकानी लिहीले आहे ते खूप मौल्यवान आहे. त्यात मंगला भागवत, कमल पाध्ये, साधना आमटे, जोंधळे यांचे विचार फार महत्वाचे आहेत.

आत्मचरित्रकार स्त्रीयांना शिक्षणाच्या संधी मिळाली पण सामान्य शिक्षणापलीकडे त्यांची झेप गेली नाही. ज्या शिकल्या त्यातही अगदी मोजल्या स्त्रिया नोकरी करण्यास प्रवृत्त झाल्या आहेत. बाकी स्त्रीया आजही चुल व मुल या मध्येच गुरफटलेल्या आहेत. स्त्रीवादाची, स्त्रीमुक्ती चळवळीची स्पष्ट जाणिव व कार्य केलेल्या दोनच स्त्रीया आहेत. बहुतांश स्त्रीयांनी पती निवडचे स्वातंत्र्य घेतले, हट्ट केले पण दुदैवाने त्यांचेही सहजीवन सुखाचे व मैत्रीपूणै समजुतीचे ठरलेले नाही. दाखवून झालेल्या विवाहासारखेच त्यांच्या नशिबी पुरुषी नेतृत्व आलेले आहे म्हणजेच स्त्री आजही दुय्यमच ठरताना दिसते. ती घरात, आपल्या व्यक्तित्वात स्वातंत्र्याचा अनुभव घेऊ पाहते पण कौटूंबिक बंधनात नक्कीच अडकलेली राहते. ह्या स्त्रीयांनी स्वातंत्र्याविषयी लिहीताना सामाजिक बंधनांना फारशी भिक घातलेली दिसत नाही. पण त्यांना पुरुषप्रधानतेने लक्ष्मणरेषा आखून दिली आहे एवढे त्या सुचवू शकल्या आहेत. स्त्रीवादाची जाण, ओळ्ख नसली तरी प्रत्येकीने स्वयंभूपणे का होइना स्व अस्तित्वाचा विचार केलेलाच दिसतो. अस्मितेसाठी त्या झगडलेल्या दिसतात.

मुलीच्या शिक्षणास सर्रास विरोध असल्याचे त्यांनी लिहिले आहे. आज २००१ च्या जनगननेनुसार पुरुष साक्षरता ७६ आहे तर स्त्रीयांचे प्रमाण ५४ एवढे आहे. अर्थात १९९१ च्या जनगणेपेक्षा हे प्रमाण वाढलेले आहे मग यापूर्वी ५० वर्षापूर्वीच्या काळात या स्त्री लेखिका शिक्षणासाठी किती धडपडल्या असतील याचा विचारच न केलेला बरा. या स्त्री लेखिकांतील मोजक्याच मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळाले. संधी मिळाली. बहुतांश लेखिका अल्पशिक्षितच आहेत. अर्थात असे असले तरी ह्या स्त्री लेखिकांनी आपल्या मुलींना चांगले उच्चशिक्षण देण्यावर भर दिलेला दिसतो.

## संदर्भ


१ वंचिता -विद्यादेवी परचूरे

२ बंध-अनुबंध कमल पाध्ये

३ साथसंगत -रागिनी पुंडलीक

४ वंचिता विद्यादेवी परचुरे

५ समीधा -साधना आमटे

६ बीन पटाची चौकट - इंदूमती जोंधळे



प्रा.डॉ.बापू जी घोलप

मु.पो. लिंबागणेश ता. जि. बीड ४३११२६

मो. ७५८८०५७६९५